RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ९७(२)] मंगळवार, जुलै ३१, २०१८/श्रावण ९, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २५७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै २०१८.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन २०१८/प्र.क्र.२८/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ३२८, च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (त्रेसष्ट) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने " महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ " यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजले आहे, त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा **दिनांक ५ सप्टेंबर २०१८** रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

**२.** उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींकडून महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकापूर्वी येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना शासन विचारात घेईल.

**नियमांचा मसुदा**

**१.** या नियमांना, " *महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) (तिसरी सुधारणा) नियम, २०१८* " असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ४३ नंतर पुढीलप्रमाणे नियम ४३ क समाविष्ट करण्यात येत आहे :—

" **४३क.** ***अतिक्रमण नियमानुकूल करण्याकरिता योजना तयार करण्याचे शासनाचे अधिकार.—***‍*संहितेच्या कलम ५१ च्या परंतुकाच्या तरतुदींना अधीन राहून, या नियमांमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, शासनास शासकीय जमिनींवरील निवासी प्रयोजनासाठीचे अतिक्रमणे नियमानुकूल करण्याकरिता संपूर्ण राज्याकरिता किंवा राज्याच्या विनिर्दिष्ट क्षेत्राकरिता सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे योजना तयार करता येईल, आणि या योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींवर व शर्तीच्या अधिनतेने, असे अतिक्रमण नियमानुकूल करता येईल.या योजनेमध्ये इतर गोष्टींबरोबरच पात्रतेचे निकष, अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या अटी व शर्ती, आणि अशा स्वरुपाची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याकरिता सक्षम प्राधिकारी इत्यादी विषयीची तरतुद करता येईल."*

**३.** महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ५१ नंतर पुढीलप्रमाणे नियम ५२ समाविष्ट करण्यात येत आहे :—

" **५२.** ***कोणत्याही नियमाच्या तरतुदी शिथील करण्याचे शासनाचे अधिकार.—***‍*शासनाचे मते विशेष स्वरुपाचे असेल, अशा एखादया प्रकरणाबाबत लेखी कारणे नमूद करुन यापैकी कोणताही नियम शासनास शिथील करता येईल."*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 30th July 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No.Jamin.2018/C.R. 28 /J-1.—The following draft of rules further to amend the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section *(1)* and clause *(lxiii)* of sub-section *(2)* of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section *(1)* of section 329 of the said Code, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after **5th September, 2018.**

**2.** Any objection or suggestion, which may be received by the Additional Chief Secretary (Revenue), to the Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai-400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

**1.** These rules may be called the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) (*Third Amendment) Rules, 2018.

**2.** After rule 43 of the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, the following rule **43A** shall be inserted, namely :—

" ***43A. Government's powers to frame scheme for regularization of encroachment.—*** *Subject to the provisions of proviso to section 51 of the Code, notwithstanding anything contained in these rules, the Government may frame scheme for the whole State or a specific part of the State, by general or special order for regularization of encroachment on Government lands for residential purpose on such terms and subject to such conditions as may be specified in such scheme. Such scheme may inter-alia provide for the eligibility criteria, the terms of regularization and the Authority competent for such regularization, etc.*"

**3.** After rule 51 of the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, the following rule 52 shall be inserted, namely :—

" ***52. Powers of Government to relax provisions of any rule.—*** *The Government may, for the reasons to be recorded in writing, relax any of these rules in respect of a case which, in its opinion, is of a special nature.*"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.